# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१४ (प्रतिनीधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पर्यावरण व भूशास्त्र विभागाचे डॉ.एस. एन. पाटील यांची भूशास्त्र आणि संशोधन योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पर्यावरण तज्ज्ञ मूल्यांकन समितीमध्ये नियुक्ती झाली आहे. सदरची नियुक्ती ही तीन वर्षाची असेल.

केंद्र सरकारने पर्यावरण आणि जलवायू मंत्रालय तर्फे महाराष्ट्र राज्य सरकारशी सल्लामसलत करून महाराष्ट्र राज्यातील खाणकाम, उद्योगांशी संबंधित सर्व प्रकल्पांसाठी आणि सिंचन मदत करण्याच्या उद्देशाने पर्यावरण संबंधी प्रथम राज्य तज्ञ मूल्यांकन समिती स्थापन केली आहे. डॉ. एस.एन. पाटील यांची भूशास्त्र आणि संशोधन योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य पर्यावरण तज्ञ मूल्यांकन समिती मध्ये निवड झाली आहे. सदर नियुक्ती हि पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी आहे. त्यांच्या नियुक्ती मुळे खान्देशातील संशोधन आणि अध्यापनाला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

डॉ. पाटील मागील ३४ वर्षांपासून भूशास्त्र विषयामध्ये संशोधन आणि शैक्षणिक कार्य करीत आहेत.डॉ. पाटील यांच्या मार्गदर्शना अंतर्गत ११ विदयार्थी पीएच. डी. आणि ०१ विदयार्थी पोस्ट पीएच.डी. संशोधन करीत आहेत. डॉ. पाटील यांनी ११३ शोधनिबंध सुप्रसिद्ध वैज्ञानिक मासिकामध्ये प्रकाशित केले आहेत तसेच ७ संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत.

डॉ पाटील हे भूशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा विद्या परिषद सदस्य या नात्याने सेवा बजावत आहेत. डॉ. पाटील यांना उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावतर्फे देण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०१६ आणि २०२३ मध्ये शोधनिबंध पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. डॉ. पाटील यांची नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेस इंडिया (NASI) चे सदस्य २०२१ म्हणून सेवा बजावत आहेत. डॉ पाटील भूशास्त्र आणि पर्यावरण संबधी भारतातील सुमारे विविध १० संस्था/अकादमी येथे कार्यरत आहे. डॉ. पाटील हे "एससोसिएशन ऑफ जिऑलॉजिस्ट अँड हैड्रोजिओलॉजीस्टस" महाराष्ट्र चे उपाध्यक्ष देखील आहेत. डॉ पाटील इंडियन सोसायटी ऑफ इंजिनीअरिंग जिओलॉजीचे कार्यकारी परिषद सद स्य २०२३-२४ म्हणून सेवा बजावत आहेत.

त्यांच्या या निवडीबद्दल कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

..............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ जून, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता